: पत्र :

प्रति,

**नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे.**

**क्रमांक : मुद्रांक–१०९२/३९७७/प्र.क्र.१११३/म–१**

**महसूल व वन विभाग**
**मंत्रालय, मुंबई–४०००३२**
**दि. : १६ एप्रिल १९९३**

**विषय :– मुद्रांकाचा परतावा मंजूर करण्याच्या प्रकरणी मुद्रांकाच्या खरेपणाबाबत छाननी करणे.**

मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ च्या कलम ५२ अ(१)(२)(३) अन्वये मुद्रांकाचा परतावा देण्याच्या प्रकरणांवर निर्णय घेण्यापूर्वी, संबंधित मुद्रांक बनावट नाहीत याची खातरजमा केली जाणे आवश्यक आहे असे शासनाच्या वित्त विभागाने कळविले आहे. त्यानुसार कळविण्यात येते की, संबंधित अधिकाऱ्यांना अशा मुद्रांकाबाबत आवश्यक छाननी करुन, सकृतदर्शनी जे मुद्रांक खरे आहेत असे निदर्शनास येईल अशा मुद्रांकाचा परतावा देण्याबाबत विचार करण्याच्या सूचना देण्यात याव्यात. परवानाधारक मुद्रांक विक्रेत्यांकडून मुद्रांक विकत घेतलेले आहेत किंवा कसे ही बाब यासाठी प्रामुख्याने विचारात घेण्यात यावी. छाननीनंतर जे मुद्रांक बनावट नाहीत असे सकृतदर्शनी स्पष्ट होईल त्याचे बाबत तसे प्रमाणपत्र देऊन नंतरच परतावा देण्यात यावा. तसेच अशा छाननीनंतर जे मुद्रांक बनावट आहेत अशी शंका उत्पन्न होईल, त्या मुद्रांकांच्या खरेपणाबद्दल अधिकृत शास्त्रशुध्द तपासणी करुन घेणे आवश्यक राहील, असेही स्पष्ट करण्यात यावे.

वरीलप्रमाणे आवश्यक सूचना सर्व संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात याव्यात व त्याची प्रत शासनाकडे पाठवावा. शासनाकडे प्रस्ताव पाठविताना, मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी यांचेकडून असे प्रमाणपत्र येणे आवश्यक आहे, याची कृपया नोंद घ्यावी.

**सही/**

**(माधवी श.जोशी)**
**अतिरिक्त कार्यासन अधिकारी**
**महसूल व वन विभाग.**

**प्रत :–**

**अवर सचिव, वित्त विभाग, (व्यय–१०) यांना माहितीसाठी अग्रेषित.**